**<u>नियमित दिवाणी दावा क्र.९७/२०१६</u>**
**<u>भगवान वि. नागेश व ईतर</u>**

–:: **<u>नि.क्र.४३ लगत आदेश</u>** ::–

वादी आणि साक्षीदार गैरहजर आहे. वादीचे अधिवक्ता श्री. देशमुख हे हजर आहेत. त्यांनी सदर साक्षीदार येत नसल्याने त्याची साक्ष मागे घेणार आहे असे सांगितले. परंतु त्याअनुषंगाने लेखी कळविले नाही. सदर साक्षीदाराने दि.२५/११/२०२४ पासून पुरावा पूर्ण केला नाही आणि उलटतपास दिलेला नाही. त्याच्या कसुरामुळे त्याची साक्ष काढून टाकण्यात येते.

०२. आदेश संगणकावर टंकलिखित केला आणि खुल्या न्यायालयात घोषित केला.

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2025.12.12 17:50:35 +0530

DISTRICT COURTS MAHARASHTRA

**ठिकाण – देवणी** **( श.अ. सुरजुसे )**

**दिनांक – १२–१२–२०२५** **दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**

**देवणी.**

**नियमित दिवाणी दावा क्र.९७/२०१६**
**भगवान वि. नागेश व ईतर**

-:: **नि.क्र.१ लगत आदेश** ::-

वादीने साक्षीदारांची साक्ष पूर्ण करण्यास आणि ईतर साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यास कसूर केला. त्यामुळे दावा विनाकारण प्रलंबित ठेवणे आणि वादीच्या पुराव्याकरिता नेमणे अनुचित ठरेल. वादीला एक-एक साक्षीदारांची साक्ष तुकड्यातुकड्यांमध्ये नोंदविता येणार नाही. वादीच्या कृतीमुळे प्रकरण विनाकारण लांबत आहे. सबब वादीची साक्ष बंद करण्यात येते. प्रतिवादींनी पुढील तारखेला न चुकता सर्व साक्षीदारांची साक्ष नोंदवावी.

०२. आदेश संगणकावर टंकलिखित केला आणि खुल्या न्यायालयात घोषित केला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2025.12.12 17:50:40 +0530

**ठिकाण – देवणी** **( श.अ. सुरजुसे )**
**दिनांक – १२-१२-२०२५** **दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**
**देवणी.**